*Indian Streams Research Journal*
Vol.1,Issue.V/June; 12pp.1-4 डॉ. सौ. स्वराली चंद्रकांत कुलकर्णी **ISSN:-2230-7850**

**Research Papers**

# मध्ययुगीन करमाळा स्थापत्यकलेचा उत्कृष्ट आविष्कार

डॉ. सौ. स्वराली चंद्रकांत कुलकर्णी
एस. एन. डी. टी. आर्टस्‌व कॉमर्स
महिला महाविद्यालय, कर्वे रोड, पुणे.

## *प्रस्तावना :–*

इ. स. **1689** नंतर करमाळ्यास ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्व प्राप्त झाले. यापुर्वीचा फारसा इतिहास उपलब्ध होत नाही. राजा रावरंभा निंबाळकर करमाळ्यास वास्तव्यास आले. तेव्हापासून या भागाचा इतिहास आढळतो. करमाळा जेऊर रस्त्यावरील टेकडीवर 'हजरत कर में मौला' या सुफी पंथीय साधूचा दर्गा आहे. या मुसलमान साधूच्या नावावरुन 'करमाळा' हे नाव पडले असे अनुमान आहे. **1**

## इतिहास ः

श्रीछत्रपती शिवाजीराजांच्या कारकिर्दीत करमाळा भागाचा फारसा उल्लेख नसला तरी शिवाजीराजांच्या बालपणीचा काही काळ करमाळा तालुक्यातील भिमेच्या काठी जिंती येथे गेल्याची नोंद आढळते. शिवाजीराजे यांचे पणजोबा बाबाजीराजे भोसले वेरुळ घृष्णेश्वर येथून भीमातीरी देऊळगावची पाटीलकी व मौजे खानवटे व कसबे जिंती अशा भीमातीरी तीन गावच्या पाटीलक्या खरेदी करुन व आपणाकडे वहिवाट चालती करुन गुमास्ते ठेवून नंतर ते वेरुळला परत गेल्याची नोंद मिळते. यावरुन बाबाजीराजे, मालोजीराजे, शहाजीराजे व बालवयात शिवाजी राजे आणि मातोश्री जिजाबाईचा सहवास या गावाला लाभला म्हणून या गावाची ऐतिहासिक परंपरा महत्त्वपुर्ण ठरते. मातोश्री जिजाबाई जिंजीस असताना एका ब्राम्हण विधवा स्त्रीला जमिनीचे दानपत्र आज्ञा काढून दिल्याची नोंदही आढळते. शिवरायांचे थोरले बंधू संभाजी सन **1654** मध्ये कनकगिरीच्या वेढयात मारले गेल्यानंतर त्यांचे पुत्र उमाजी राजे यांना जिंती गाव परंपरागत जहांगिरी होती. आजही या गावात राजे भोसले यांचे वंशज रहात असून त्यांचा चिरेबंदी वाडा व गढीही अस्तित्वात आहे. **2** करमाळा येथे प्रत्यक्ष लढाया झाल्या नसल्या तरी हे गाव रावरंभा निंबाळकरांची जहांगिरी होती. **3** औरंगजेबाच्या मृत्यूनंतर दक्षिणेचा सुभेदार निजाम उलमुल्कने पराक्रमी मराठा सरदार रंभाजी निंबाळकरांना हाताशी धरुन पुणे प्रांतावर चाल करुन मराठ्यांचे सरदार बाळाजी विश्वनाथ यांचा पुरंदरजवळ पराभव केला. निंबाळकरांच्या या पराक्रमाबद्दलल निजाम उल मुल्कने 'अर्जुन बहादूर रावरंभा' असा किताब देवून पुणे प्रांताची जहांगिरी इ. स. **1713** मध्ये दिली. बाजीराव कदम हा निंबाळकरांच्या जहांगिरीला व पुणे जहांगिरीचा व्यवस्थापक होता. **4** इ. स. **1727** मध्ये निजामाने थोरला बाजीराव पेशवा काळात शाहू महाराजांना पुणे तर रावरंभा निंबाळकरांना करमाळा जहागिरी दिली. याच काळात रावरंभा करमाळयास वास्तव्यास येवून त्यांनी करमाळा आणि परिसरात ऐतिहासिक स्थळांची उभारणी केली, ती पुढीलप्रमाणे

## कमला भवानी मंदिर ः

गावाबाहेर एका उंच टेकडीवर मध्ययुगीन स्थापत्यकलेचा उत्कृष्ट नमुना असलेले कमला भवानीचे मंदिर आहे. महाराष्ट्राची कुलदेवता तुळजाभवानीचे उपासक असलेल्या रावरंभा निंबाळकरांनी गावाबाहेर उजाड टेकडीवर भग्नावस्थेत असलेल्या हेमाडपंथी मंदिराचा जिर्णोध्दार करुन भवानीमातेचे भक्कम / सुंदर मंदिर बांधले. **5** उंच टेकडीवर मंदिरात जाण्यासाठी पुण्याच्या पर्वतीप्रमाणे पायऱ्याची चढण असून मंदिरापर्यंत दगडी रस्ता आहे. या पायऱ्यांना सुरुवातीस उजव्या बाजूस मारुतीचे व त्यामागे छोटे विष्णू मंदिर आहे. थोड्या पायऱ्या चढून गेल्यानंतर एकात एक अशी दगडी मजबूत तटबंदीने घेरलेले मंदिर दृष्टीस पडते. मंदिरास पश्चिमेकडून दोन तर पुर्वेकडून एक प्रवेशद्वार आहे. ही प्रवेशद्वारे दोन्ही तटबंदीला भव्य कमानीची व भक्कम दरवाजा असलेली आहेत. पश्चिमेकडील दोन्ही भव्य व भक्कम प्रवेशद्वारे दाक्षिणात्य बांधणीची त्यावर गगनचुंबी गोपुरे असून प्रत्येक गोपुरावर **5** ते **7** धातूंचे कलश बसविले आहेत. **6** या गोपुराची उंची **24** मी **40** सेंमी आहे. यानंतर पश्चिमेकडील दुसरे प्रवेशद्वार शिवद्वार आहे. **7** या प्रवेशद्वारातून आत गेल्यावर **4.50**मी. ×**3.30**मी. मापाच्या **96** ओवया दिसतात. तटबंदीच्या आत दगडी फरसबंदी असून या परिसराच्या मध्यभागी जगदंबा कमलाभवानीचे मुख्य मंदिर आहे. **2** मी. उंचीच्या **96** दगडी खांबावर हे मंदिर उभे असून या मंदिराची लांबी **22.80** मी., रुंदी **20** मी आहे. मंदिराचे शिखर **8** टप्प्यात बांधले असून प्रत्येक टप्प्यावर देवदेवता देवदेवतांनंतर योगी व योगिनी, हत्ती, हरिण यांच्या प्रतिमेबरोबरच, काही इस्लामी पध्दतीची नक्षी आहे. या सर्व प्रतिमा **96** आहेत. मुख्यमंडपाची रचना हेमाडपंथी शैलीप्रमाणे असून मुख्यमंडप, सभामंडप, अंतराळ व गर्भगृहे असे त्याचे **4** भाग आहेत. हा मुख्यमंडप **96** खांबावर उभा असून मुखमंडप **2** स्तंभाचा, नंतर **12** स्तंभाच्या **3** ओळी, **6** स्तंभाच्या दोन व दोन स्तंभाच्या दोन

**Please cite this Article as :** डॉ. सौ. स्वराली चंद्रकांत कुलकर्णी, मध्ययुगीन करमाळा स्थापत्यकलेचा उत्कृष्ट आविष्कार : **Indian Streams Research Journal (June ; 2012)**

*Indian Streams Research Journal*
Vol.1,Issue.V/*June;* 2012

रचनेत हे मंदिर उभे आहे .8 सभामंडपात 8 खांबावर उभे असलेले अष्टकोनाकृती छत आहे . यानंतरच्या गर्भगृहात कमलाभवानीची काळ्या गंडकी शिळेची, सिंहासनारुढ पुर्णाकृती1 .50 मी . उंचीची आठ हातांची अप्रतिम मुर्ती आहे . तिच्या पायाशी महिषासूर आहे . अलंकार आणि आयुधे मुळ पाषणातच कोरलेली आहेत .9 तिच्या उजव्या हातात बाण, खड्ग, ढाल, गदा तर डाव्या हातात शंख, मुशुंर्डी, धनुष्य आणि राक्षसाची शेंडी आहे . मुकुटावर चंद्र आणि सूर्य आहे . ही मुर्ती शिल्पकलेचा उत्कृष्ट नमुना आहे .

दुर्गा भवानीच्या मुख्य गाभाऱ्याच्या उजव्या भागात श्री महादेवाची पाषाणाची पिंड असून त्यावरती पाच फण्याचा शेष नागाचे काश्याचे छत्र आहे . याच्या उजव्या बाजूचे मागील भागात एक उत्कृष्ट शिल्पकला असलेले गणेश मंदिर आहे . दर्शनी भागात कार्तिक स्वामीची मुर्ती आहे . याशिवाय भवानी मंदिराच्या सभामंडपत डाव्या बाजूस काळ्या गंडकाची गरुडारुढ विष्णूलक्ष्मीची व त्यांचे मागील गाभाऱ्यात श्रीसूर्यनारायणाची सप्तअश्व जोडलेलीरथासह सुंदर काळ्या पाषाणाची मुर्ती आहे . एकाच प्रमुख मंदिरात वेगवेगळ्या पाच देवतांचे ते शक्तीपंचायतन आहे . असे शक्ती पंचायतन काशीशिवाय अन्य कोठेही नाही .10 मंदिराच्या समोरील पुर्वमहाद्वाराच्या दोन्ही बाजूस 24 .40 मी . उंचीच्या 3 दगडी दीपमाळा असून यातून अगदी वरच्या टोकापर्यंत जाण्यासाठी दिल्लीच्या कुतुबमिनारप्रमाणे पायऱ्यांचा जिना आहे . या जिन्याच्या प्रत्येक टप्प्यावर हवा येण्यासाठी किंवा दिवे लावण्यासाठी झरोके केलेले आहेत . या दीपमाळेवरती दसरा, दिवाळी या सणांच्या वेळी दिवे लावले जातात .

### कमलाभवानी मंदिर परिसरातील इतर स्मारके ः

कमलाभवानी मंदिराच्या समोरील पुर्व महाद्वाराच्या समोर तटबंदी वजा कोट असून त्यात दोन समाध्या आहेत . या समाध्या नक्की कोणाच्या हे सांगता येत नाही तरी बहुतेक या निंबाळकर राजघराण्यातील असाव्यात . पुर्वाभिमुख या दोन्ही समाधीपैकी हिंदुमुस्लिम स्थापत्याचा सुंदर मिलाप असलेली एक अत्यंत सुंदर समाधी आहे . या समाधीची बांधणी मुस्लिम ताबूतासारखी असल्याने11 रहिवासी यास 'दगडी टोला' म्हणतात . ताबूतासारखे खांब, घुमटासारखे शिखर, बाजूची इस्लामी महिरपीची बांधणी हे इस्लामी स्थापत्याचे नमुन आहेत . या समाधीच्या चारही खांबाच्या खाली तीर्थ बाहेर जाण्यासाठी गोमुखे कोरलेली आहेत . समाधीच्या आत छोटी महादेवाची पिंड आहे . यास बाजूचे खांब अष्टकोनी असल्याने ही समाधी हिंदू शिल्पकलेचा उत्तम नमुना आहे . रावरंभा निंबाळकर हे हैद्राबादच्या निजामाचे सरदार असल्याने याठिकाणी कारागिरांकडून हिंदू मुस्लिम स्थापत्याचा सुंदर समन्वय झाला असावा असे दिसते . या समाधीनंतर कोटाच्या पलीकडे एक 96 पायऱ्यांची विहीर आहे .12 ही विहीर दक्षिणोत्तर लांब, अखंड दगडाची, प्रचंड असून या विहीराचा आकार महादेवाच्या पिंडीप्रमाणे आहे . या विहीरीचा घेर अष्टकोनी असून त्यातील पायऱ्यांची संख्या 96 आहे . कमलाभवानी मंदिरात 96 खांब, 96 ओवरी शिखरावर 96 प्रतिमा, त्यावेळी करमाळा जहांगिरीत 96 गावे आणि हे मंदिर बांधणारे निंबाळकर हे 96 कुळी मराठा असा यामागचा इतिहास प्रत्यक्ष सर्वेक्षणाच्या वेळी मुलाखतीतून (गावकऱ्यांच्या) समजला . मंदिराच्या जवळच खंडोबाचे मंदिर आहे . या मंदिराच्या प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूस व मध्ये चौरसाकृती प्रवेशद्वार असल्याने हे एखादया भुईकोट किल्ल्याचे प्रवेशद्वार वाटते . गर्भगृहात मल्हारी, म्हाळसाकांत यांचे एकत्र अस्तित्व असलेली दोन शाळुंकाची एक शिवलिंग आहे . हे मंदिर अष्टकोनी सपाट छताचे आहे .

### करमाळा गावातील इतर ऐतिहासिक स्थळे ः

करमाळा किल्ला ः करमाळा किल्ला म्हणजे आज तटबंदीयुक्त शहर आहे . या किल्ल्याची आज पडझड झाली आहे . हा किल्ला रावरंभा निंबाळकरांनी बांधला .13 आंतर तटबंदीस मोठे दगडी प्रवेशद्वार असून त्यास खिळ्यांचा लाकडी दरवाजा आहे .14 किल्ला आता भग्नावस्थेत आहे . किल्ल्यास खंदकाने वेधिले आहे . तटास 16 बुरुज होते .15 जानोजीराव निंबाळकरांनी या किल्ल्याचा उपयोग प्रशासकीय कामासाठी सुरू केल्याचा उल्लेख सोलापूर मॅझेटियरमध्ये मिळतो .
ब्रम्हा, विष्णू, महेश मंदिर ः किल्ल्याच्या आतील आवारात ब्रम्हा, विष्णू आणि महेश यांची शेजारी शेजारी स्वतंत्र मंदिरे आहेत . ब्रम्हाचे मंदिर यादवकालीन असून ब्रम्हा म्हणजे चेहऱ्याचा व मस्तकाचा उभट भाग होय .16 याच्या शेजारी तटबंदीयुक्त महेश मंदिर आहे . या खुलेश्वर मंदिरात महादेवाच्या पिंडीच्या चारही बाजूस शंकराची मुखे आहे . ही शाळुंका कुरुंदाची आहे . या मंदिराच्या पलीकडे विष्णूमंदिर मराठेकालीन असून गरुडावर बसलेली लक्ष्मी विष्णूची स्फटिकाची मुर्ती मंदिरात आहे . या मंदिरात वीरगळ व त्यांचे खंडित अवशेष पडलेले दिसतात . यात स्त्री वीरगळांची संख्या जास्त आहे .

**सारांश** ः थोडक्यात, करमाळा येथील अनेक स्मारकांत हिंदूमुस्लिम स्थापत्य शास्त्राचा सुंदर समन्वय झाल्याचे आढळते . देशाच्या इतिहासामध्ये प्रादेशिक इतिहासालाही महत्त्व आहे . स्थानिक इतिहासामध्ये ही ऐतिहासिक स्मारके आपल्या अस्तित्वाची साक्ष देतात . करमाळा शहरात अनेक ऐतिहासिक स्मारके आहेत . त्यातील काही अत्यंत मजबूत, भक्कम आहे . तर काही काळाच्या उदरात गडप झाली आहे . काही स्थळे तर नामशेष होण्याच्या मार्गावर आहे . त्यामुळे पुढील पिढीला हा इतिहास महित होण्यासाठी या सर्व वास्तूंचे जतन करणे अत्यंत आवश्यक आहे .

संदर्भ ः
1 . जय अंबे कमलाभवानी, शं . आ . येवले, पृष्ठ 4
2 . प्रत्यक्ष सर्वेक्षण
3 . सोलापूर डिस्ट्रिक्ट गॅझेटियर, पृष्ठ 503
4 . मुलांचा महाराष्ट्र, गो . अ . मोडक, पृष्ठ 189190
5 . मराठी विश्वकोष, खंड3, पृष्ठ 329
6 . प्लेट क्र . 1
7 . प्लेट क्र . 2
8 . प्लेट क्र . 3
9 . जय अंबे कमलाभवानी . . ., पृष्ठ 43
10 . जय अंबे कमलाभवानी . . ., पृष्ठ 45
11 . प्लेट क्र . 4
12 . सोलापूर जिल्ह्याची बखर, गेपाळ देशमुख, पृष्ठ 42
13 . सोलापूर जिल्ह्याची बखर, पृष्ठ 42
14 . प्लेट क्र . 5
15 . सोलापूर तरुण भारत मे 1987, पडलेले किल्ला आणि विसरलेला इतिहास, पृष्ठ 6
16 . प्लेट क्र . 6

**Please cite this Article as :** डॉ . सौ . स्वराली चंद्रकांत कुलकर्णी, मध्ययुगीन करमाळा स्थापत्यकलेचा उत्कृष्ट आविष्कार : **Indian Streams Research Journal (June ; 2012)**